# अमर हिंद मंडळ, दादर
# मुंबई - ४०० ०२८

## ७९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

अमर हिंद मंडळाची ७९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक २७ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०.०० वा. मंडळाच्या सभागृहात संस्थेचे अध्यक्ष श्री. विजय जोशी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, ही विंनती.

सभेपुढील कामे: -

१) दि. १० ऑगस्ट २०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

२) वर्ष २०२५ -२६ सालचा वार्षिक अहवाल मंजूर करणे.

३) वर्ष २०२५ -२६ सालचा हिशेब व ताळेबंद मंजूर करणे.

४) वर्ष २०२६ - २७ साठी हिशेब तपासनीस नेमणे व त्यांचे मानधन ठरविणे.

५) निधीत रक्कम वर्ग करण्याबाबत ठराव मंजूर करणे.

६) माननीय अध्यक्षांच्या परवानगीने सभेपुढे येणाऱ्या अन्य विषयांचा विचार करणे.

कार्यकारी समितीच्या अनुमतीने

प्रमुख कार्यवाह

दिनांक:- १५ ऑगस्ट २०२६

**सूचना:-**

१) गणपूर्तीचे अभावी नियोजित वेळी सभा सुरु न करता स्थगित करण्यात येईल. ही स्थगित झालेली सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी दुपारी ३.०० वा. भरेल व अशी स्थगित सभा पुनर्गठित करून भरल्यावर गणपूर्ती अभावी देखील पूर्णपणे वैध असेल.

२) सभासदांना अहवाल, हिशेब, अंदाजपत्रक अथवा संस्थेच्या कामकाजासंबधी सभेत प्रश्न विचारावयाचे असल्यास त्यांनी त्यांचे प्रश्न मंडळाच्या कार्यालयात लेखी स्वरुपात सोमवार दि. १९ सप्टेंबर् २०२६ पर्यंत सांय ६ ते ८ यावेळेत (रविवार व्यतिरिक्त) सादर करावेत.

३) सभासदांनी आपले बदललेले पत्ते कृपया त्वरित कळवावे तसेच हयात नसलेल्या सभासदांच्या संबधितांनी तत्संबंधीची माहिती कार्यालयात कळविण्याची कृपा करावी.

४) सर्वसाधारण सभेसाठी येताना कृपया आपले वैध ओळखपत्र बरोबर आणावे.

५) मंडळाचा अहवाल www.amarhindmandal.com या वेबसाईटवर उपलब्ध असेल. ज्या सभासदांना अहवालाची छापील प्रत हवी असेल, त्यांना शुक्रवार दिनांक १२ सप्टेंबर् २०२६ (रविवार सोडून) पासून मंडळाच्या कार्यालयात सायं .६ ते ८ यावेळेत मिळेल.

६) अधिक माहितीसाठी संपर्क: व्हॉटसअप - ८४१९९०१०८२ कॉल - ८४१९९०१०८३

# ७९ वा वार्षिक अहवाल
## (दि. १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६)

सन्माननीय सभासद बंधु-भगिनींनो,

नमस्कार,

अमर हिंद मंडळाचा ७९ वा वार्षिक अहवाल, जमाखर्च आणि ताळेबंद पत्रके आपणांस सादर करताना कार्यकारी समितीस आनंद होत आहे. अहवाल काळात दि. २६ जानेवारी २०२६ रोजी मंडळाच्या स्थापनेला ७९ वर्षे पूर्ण झाली. अहवाल काळात मंडळाने आपले सर्व कार्यक्रम, उपक्रम तसेच स्पर्धा यांचे यशस्वीपणे आयोजन केले. मंडळ आपल्या ध्येयधोरणांनुसार कार्य करीत आहे आणि यापुढे देखील करीत राहील याची विनम्रतापूर्वक खात्री देत मंडळाच्या कार्यकारी समितीच्या वतीने वार्षिक अहवाल सादर करीत आहे.

**वसंत व्याख्यानमाला**

अमर हिंद मंडळाची ७८ वी वसंत व्याख्यानमाला दिनांक १२ एप्रिल २०२५ ते १८ एप्रिल २०२५ या कालावधीत संपन्न झाली. मंडळाच्या ७८ व्या वसंत व्याख्यानमालेचे उद्घाटन पद्मश्री मा. श्री. अशोक सराफ यांच्या मुलाखतीने झाले. तर मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त, श्री. भूषण गगराणी, केंद्रीय मंत्री मा. श्री. नितीन गडकरी, माजी केंद्रीय मंत्री लेखापाल श्री. सुरेश प्रभू, मुंबई उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीश, श्रीमती मृदुला भाटकर, मा. श्री. रवी आमले या मान्यवर वक्त्यांनी आपले विचार मांडले. **व्याख्यानमालेची सांगता श्रीमती मृदुला दाढे यांच्या 'तरी असेल गीत हे!' यांच्या सुश्राव्य गायनाने झाली.**

या अहवाल काळात मंडळाने संस्कार भारतीच्या सहकार्याने रांगोळी शिबिर आयोजित केले होते. तसेच शास्त्रवाहिनी या संस्थेच्या सहकार्याने शालेय विद्यार्थ्यांसाठी एरोमॉडेलिंग शिबिराचे आयोजन केले होते. या दोन्ही कार्यक्रमांना उत्तम प्रतिसाद लाभला.

नवरात्रोत्सवानिमित्त महिलांच्या पाककौशल्याला व्यासपीठ मिळवून देणारी 'मटा नवरंग पाककला स्पर्धा' मंगळवार दिनांक २३ सप्टेंबर २०२५ रोजी पार पडली. ही स्पर्धा 'महाराष्ट्र टाईम्स' आणि अमर हिंद मंडळ यांच्या सहयोगाने दादर येथे आयोजित करण्यात आली होती. यावेळी स्पर्धक महिलांनी नियमांचे काटेकोर पालन करून चवदार पदार्थांची मेजवानी सादर केली. 'आम्ही सारे खवय्ये' फेम अभिनेता श्री. संकर्षण कऱ्हाडे आणि शेफ डॉ. अमोल राऊळ यांनी या स्पर्धेचे परीक्षण केले. मंडळाच्या वतीने प्रमुख कार्यवाह यांनी देखील मंडळातर्फे कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सहभाग नोंदवला.

अहवाल काळात मंडळाच्या 'रेशनकार्ड' या एकांकिकेने अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषद तसेच महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले.

मंडळाला स्वामीराज प्रकाशन या संस्थेच्या वतीने प्रबोधन प्रयोगघर, कुर्ला पुरस्कृत प्रयोगघर पुरस्काराने गौरविण्यात आले. त्याचे स्वरूप रोख रु.५,०००/-, मानपत्र आणि स्मृतिचिन्ह असे होते.

तसेच रहेजा हॉस्पिटल तर्फे मंडळाने बेसिक फायर आणि सेफ्टी ट्रेनिंग आयोजित करून, आगीपासून संरक्षण कसे करावे याचा प्रत्यक्ष अनुभव उपस्थितांना दिला.

दरवर्षीप्रमाणे दर महिन्याला सांस्कृतिक कार्यक्रमांचे तसेच क्रीडा विभागाचे दरवर्षी होणारे कार्यक्रम, उपक्रम आणि स्पर्धा यांचे आयोजन यशस्वीपणे केले.

**तहहयात सभासद**

अहवाल काळात नवीन तहहयात सभासद करून घेण्यात आले नाहीत.

**वार्षिक सर्वसाधारण सभा आणि निवडणुका**

अहवाल काळात ऑगस्ट २०२५ या महिन्यामध्ये निवडणूका जाहीर झाल्याने आधीच्या कार्यकारिणीच्या १ एप्रिल २०२५ ते १० ऑगस्ट २०२५ या काळात एकूण ४ मासिक सभा व २ संयुक्त सभा झाल्या. तर नवीन कार्यकारिणीच्या १ ऑगस्ट २०२५ ते मार्च २०२६ या काळात ३ संयुक्त सभा व १० मासिक सभा झाल्या. (परिशिष्ट अ)

मंडळाची निंवडणूक आणि वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. १० ऑगस्ट २०२५ रोजी झाली. कार्यकाळ पूर्ण झाल्याने मंडळाच्या संपूर्ण कार्यकारिणीची निवडणूक त्याच दिवशी झाली. निवडणूकीसाठी श्री. शिवा पंडित, गोरेगाव यांची निवडणूक अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली होती. माननीय श्री. शिवा पंडित व त्यांचे सहकारी यांच्या देखरेखीखाली निवडणूका व्यवस्थित पार पडल्या याबद्दल त्यांचे व त्यांच्या सहकारी वर्गाचे मंडळ आभारी आहे.

## 12AB/80/CSR-1

अहवाल काळात मंडळाला आयकर कायद्यांतर्गत आयकर सवलत मिळावी म्हणून पुढील १० वर्षासाठी १२ AB तर देणगीदार यांना सवळतीचा लाभ मिळवा म्हणून पुढील ५ वर्षासाठी ८० G चे प्रमाणपत्र मिळाले आहे. तसेच आनंदाची गोष्ट म्हणजे समाजोपयोगी कामे करण्यासाठी अहवाल काळात मंडळाला CSR-1 नोंदणीपत्र प्राप्त झाले आहे.

आयकर सवलत प्रमाण पत्र क्र. URN.U/S.80 G: AAATA0065H25MB02 (upto 2031)

PAN: AAATA0065H, CSR REG NO. CSR00100016

वर्ष २०२५-२०२८ या कालावधीसाठी निवडणुकीसाठी उभे राहिलेले उमेदवार आणि पदनिहाय संपूर्ण कार्यकारिणी पुढीलप्रमाणे -

विश्वस्त पदासाठी एकूण प्राप्त मते

| अ. क्र. | उमेदवाराचे नांव | प्राप्त मते |
|---|---|---|
| १ | दळवी दिलीप दिवाणजी | ०४२ |
| २ | देशपांडे अरुण अनंत | १२७ |
| ३ | पडते दीपक नारायण | १२४ |
| ४ | सराफ सुभाष लक्ष्मण | ११९ |
| | बाद झालेली मते | ०८ |
| | एकूण विश्वस्त पदासाठी झालेले मतदान | १६७ |

अध्यक्ष पदासाठी प्राप्त झालेली मते

| अ. क्र. | उमेदवाराचे नांव | प्राप्त मते |
|---|---|---|
| १ | जोशी विजय प्रभाकर | १०८ |
| २ | सावंत दत्तात्रय अनंत | ०४८ |
| | बाद झालेली मते | ११ |
| | एकूण अध्यक्ष पदासाठी झालेले मतदान | १६७ |

उपाध्यक्ष पदासाठी प्राप्त झालेली मते

| अ. क्र. | उमेदवाराचे नांव | प्राप्त मते |
|---|---|---|
| १ | भाटकर संजय नथुराम | ०५१ |
| २ | सोनटक्के विठ्ठल शंकर | ११३ |
| ३ | तांबे रमेश पांडुरंग | ११२ |
| | बाद झालेली मते | ११ |
| | एकूण उपाध्यक्ष पदासाठी झालेले मतदान | १६७ |

कार्यकारी समिती सदस्य पदासाठी प्राप्त झालेली मते

| अ. क्र. | उमेदवाराचे नांव | प्राप्त मते |
|---|---|---|
| १ | चव्हाण रोहंन  राजेंद्र | १२२ |
| २ | चिपळूणकर संतोष यशवंत | ०३९ |
| ३ | काळसेकर साईनाथ गजानन | ११९ |
| ४ | कर्णिक राजेंद्र शांताराम | ११४ |
| ५ | किंबहुने अमीत विश्वास | १०८ |
| ६ | खरे नेहा माधव | ११४ |
| ७ | कोल्हटकर सीमा चंद्रशेखर | ११९ |
| ८ | नाटेकर रमेश लक्ष्मण | ०४१ |
| ९ | पाटील प्रफुल्ल दामोदर | ११९ |
| १० | पेडणेकर मधुरा संजय | १२६ |
| ११ | राणे विजय प्रताप | ११७ |
| १२ | साडविलकर दीपक वासुदेव | ०४० |
| १३ | सावंत दत्तात्रय अनंत | ०४४ |
| १४ | सावंत निलेश अनंत | १११ |
| १५ | तळेकर उत्कर्षा विलास | १०९ |
| | बाद झालेली मते | ००९ |
| | एकूण कार्यकारी समिती साठी झालेले मतदान | १६७ |

विजयी उमेदवार

| अ. क्र. | उमेदवाराचे नांव | पद |
|---|---|---|
| १ | देशपांडे अरुण अनंत | विश्वस्त |
| २ | पडते दीपक नारायण | विश्वस्त |
| ३ | सराफ सुभाष लक्ष्मण | विश्वस्त |
| ४ | जोशी विजय प्रभाकर | अध्यक्ष |
| ५ | सोनटक्के विठ्ठल शंकर | उपाध्यक्ष |
| ६ | तांबे रमेश पांडुरंग | उपाध्यक्ष |
| ७ | चव्हाण रोहंन राजेंद्र | सदस्य |
| ८ | काळसेकर साईनाथ गजानन | सदस्य |
| ९ | कर्णिक राजेंद्र शांताराम | सदस्य |
| १० | किंबहुने अमीत विश्वास | सदस्य |
| ११ | खरे नेहा माधव | सदस्य |
| १२ | कोल्हटकर सीमा चंद्रशेखर | सदस्य |
| १३ | पाटील प्रफुल्ल दामोदर | सदस्य |
| १४ | पेडणेकर मधुरा संजय | सदस्य |
| १५ | राणे विजय प्रताप | सदस्य |
| १६ | सावंत निलेश अनंत | सदस्य |
| १७ | तळेकर उत्कर्षा विलास | सदस्य |

सर्व सभासदांना विनंती आहे की, आपले पत्ते बदलले असल्यास ते बदलले पत्ते आपला संपर्क क्रमांक, ई मेल ही माहिती मंडळाच्या amarhindmandal@rediffmail.com या मेल वर पाठवावी. जेणेकरून वेळोवेळी होणारे मंडळाचे कार्यक्रम व उपक्रम आपल्यापर्यंत पोचवणे सोयीचे होईल. तसेच आपल्याला WhatsApp द्वारे कार्यक्रम माहिती होण्यासाठी मंडळाचे पुढील संपर्क क्रमांक आपल्या मोबाइल मध्ये समाविष्ट करा. ते पुढीलप्रमाणे. WhatsApp नंबर - ८४१९९०१०८२ आणि फोन करण्यासाठी ८४१९९०१०८३.

# कार्यक्रम आणि उपक्रम २०२५ - २०२६

## ७८ वी वसंत व्याख्यानमाला

## दि. १२ एप्रिल २०२५ ते १८ एप्रिल २०२५

| दिनांक | वक्ते | विषय |
|---|---|---|
| १२ एप्रिल २०२५ | पद्मश्री मा. श्री. अशोक सराफ<br>मुलाखत - श्री. राजीव जोशी आणि श्रीमती नेहा खरे | माझा कला जीवनाचा प्रवास |
| १३ एप्रिल २०२५ | मा. श्री. रवी आमले, प्रथितयश लेखक | रॉ. गुप्तचर यंत्रणा आणि आपण |
| १४ एप्रिल २०२५ | मा. श्री. नितीन गडकरी, केंद्रीय मंत्री | महामार्ग विकासाचा |
| १५ एप्रिल -२०२५ | श्री. भूषण गगराणी, मुंबई मनपा आयुक्त | मुंबई आहे कुठे? जाणार कुठे? |
| १६ एप्रिल २०२५ | लेखपाल श्री. सुरेश प्रभू, माजी केंद्रीय मंत्री | भारत महासत्ता बनताना |
| १७ एप्रिल २०२५ | श्रीमती मृदुला भाटकर, निवृत्त न्यायाधीश, मुंबई उच्च न्यायालय | कोर्टाची पायरी आणि नागरिक |
| १८ एप्रिल २०२५ | श्रीमती मृदुला दाढे, प्रथितयश गायिका | तरी असेल गीत हे! |

| दिनांक | कार्यक्रम / उपक्रम | तपशील |
|---|---|---|
| ७ एप्रिल २०२५ ते ९ एप्रिल २०२५ | संस्कार भारती यांच्या सहकार्याने रांगोळी शिबिर | श्रीमती प्रतिभा करंदीकर यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या शिबिरात एकूण २२ शिबिरार्थी यांनी उपस्थिती दर्शविली. |
| १५ ते २९ एप्रिल २०२५ | बालनाट्य प्रशिक्षण शिबीर | शिबिर संचालक - श्रीमती लीला हडप<br>मार्गदर्शक - श्री. संजय क्षेमकल्याणी, श्री. राजीव जोशी, श्री. सम्राट साळवी, श्री. ओमकार जाधव, श्री. सुमित पाटील, श्रीमती मुक्ता बाम, श्री. रवींद्र ढवळे, श्री. दत्ता सावंत, श्री. रमेश तांबे<br>वैशिट्ये बालनाट्य सर्वांगीण प्राथमिक ओळख, लेखन, दिग्दर्शन, अभिनय, नृत्य, संगीत, नेपथ्य, प्रकाशयोजना, रंगभूमी<br>(बालनाट्य शिबिरात २० जणांनी भाग घेतला.) |
| ०१ मे २०२५ | स्नेहमेळावा<br>नाटक - ‘ठरता ठरता ठरेना’ | हितचिंतक व तहहयात सभासदांसाठी, ‘ठरता ठरता ठरेना’ या व्यावसायिक नाटकाचा नाट्यप्रयोग.<br>प्रमुख भूमिका - श्रीमती वनिता खरात, श्री. सागर देशमुख |
| १८ मे २०२५ | एरोमोड्लिंग शिबिर | शास्त्रवाहिनी, पुणे या संस्थेच्या सहकार्याने शालेय विद्यार्थ्यांसाठी आयोजन.<br>एकूण २४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. |
| २५ जून २०२५ | सांस्कृतिक अमावास्या | दीर्घांक - Alexa Play Deshpande’s Will<br>दिग्दर्शक- श्री. अमित सोलंकी<br>लेखिका- श्रीमती मानली काळे |
| २८ जून २०२५ | शोकसभा | माजी प्रमुख कार्यवाह, कार्याध्यक्ष कै. श्री. एस. एस राणे |
| २४ जुलै २०२५ | सांस्कृतिक अमावास्या | शनैश्वरम (दशावतार) - श्री. विशाल गावडे (दिग्दर्शक आणि रंगावृत्ती) |
| ०२ ते ०७ ऑगस्ट २०२५ | नाट्यसंहिता वाचन | पक्ष्याच्या शोधात पिंजरा- श्री. रवींद्र लाखे<br>ऑन हायर- श्री. मंदार श्रोत्री<br>अर्धरात्र कलली - श्री. रवींद्र वाडकर |

| | | |
|---|---|---|
| | | झुळूक - श्रीमती मेधा देशमुख<br>पासवाला - श्री. महेश केसरकर |
| १० ऑगस्ट २०२५ | वार्षिक सर्वसाधारण सभा व निवडणूक वर्ष २०२५ - २०२८ या कालावधीसाठी | |
| १५ ऑगस्ट २०२५ | ७९ वा स्वातंत्र्यदिन २०२५ | मंडळाचे माजी प्रमुख कार्यवाह मा. श्री. रविंद्र ढवळे यांच्या हस्ते ध्वजारोहण आणि विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ.<br>मंडळाच्या खेळाडूंचा गुणगौरव, सत्कार आणि शिष्यवृत्ती वाटप.<br>कै. रमेश वरळीकर स्मरणार्थ खो-खो पुरस्कार मानकरी<br>१) श्री. आदेश कागडा<br>२) श्रीमती देविशा म्हात्रे |
| २३ ऑगस्ट २०२५ | सांस्कृतिक अमावास्या | दीर्घांक - काठ - सादरकर्ते श्रीमती मधुवंती मोहन |
| १४ सप्टेंबर २०२५ | कै. काशीनाथ घाणेकर जयंती निमित्त कार्यक्रम | संहिता व सादरीकरण - श्री. रमेश भिडे |
| २१ सप्टेंबर २०२५ | सांस्कृतिक अमावस्या | स्वर प्रसन्न - श्रीमती रेखा दिवेकर |
| २३ सप्टेंबर २०२५ | मटा- नवरंग<br>(पाककला स्पर्धा) | प्रमुख पाहुणे आणि परीक्षक: - श्री. संकर्षण कऱ्हाडे<br>शेफ:- डॉ. अमोल राऊळ<br>सहकार्य - श्रीमती सीमा कोल्हटकर |
| २७ सप्टेंबर २०२५ | बेसिक फायर आणि सेफ्टी ट्रेनिंग | रहेजा हॉस्पिटल, माहीम |
| २८ सप्टेंबर २०२५ | विचार मंथन शिबीर | अमर हिंद मंडळ, सभागृह |
| १८ ते १९ नोंव्हेबर २०२५ | कै, आबा पडते राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा - प्राथमिक फेरी स्थळ - अमर हिंद मंडळ, दादर | प्राथमिक फेरी परीक्षक<br>1) श्री. महेंद्र जाधव<br>2) श्री. मिहिर राजदा<br>उतेजनार्थ पारितोषिक लेखक<br>१) श्री. दत्तात्रय सावंत - वृंदावन<br>२) श्रीमती माधुरी ताम्हणकर - क्रॉस कनेक्शन<br>३) विनीत विष्णू - तक्रार<br>उतेजनार्थ पारितोषिक दिग्दर्शक<br>१) श्री. मयंक ओक- तक्रार<br>२) श्री. अजय पाटील - स्वस्तिकाची ट्रॅजेडी<br>३) श्री. मच्छिंद्रनाथ आनंद - स्पर्शाची गोष्ट<br>अभिनेता / अभिनेत्री<br>१) श्री. नावसाजी कुडाव -वृंदावन |

| | | |
|---|---|---|
| | | २) श्रीमती लीला हडप - वृंदावन<br>३) श्रीमती साक्षी मणचेकर - स्वस्तिकाची ट्रॅजेडी |
| २० नोंव्हेबर २०२५ | सांस्कृतिक अमावास्या | काव्य नव्हे हा अमृत संचय (श्री. दत्तप्रसाद जोग) |
| २८नोंव्हेबर २०२५ | एकांकिका लेखन स्पर्धा<br>कै. श्रीकृष्ण राणे स्मृतिप्रीत्यर्थ राज्यस्तरीय मराठी एकांकिका लेखनस्पर्धा २०२५-२०२६ | परीक्षक:- श्री. राजीव जोशी, डॉ. श्री. समीर मोने<br>प्रथम पारितोषिक- मुक्ती- श्री. योगेश वाटवे<br>द्वितीय पारितोषिक - लूप - श्री. जयेश मेस्त्री<br>तृतीय पारितोषिक - द पपेटियर - श्री. मनीष कोलगे<br>उत्तेजनार्थ पारितोषिक -<br>१) "लेखकायन"- लेखक - डॉ. प्रशांत पुंडे<br>२) "वृंदावन" - लेखक - श्री. दत्तात्रय सावंत<br>३) “तू करेक्ट आहेस” - श्रीमती विद्या थोरात काळे "विजू" |
| २८नोंव्हेबर २०५ | कै. आबा पडते राज्यस्तरीय मराठी एकांकिका स्पर्धा- २०२५<br>अंतिम फेरी- स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक | अंतिम फेरी - स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक परीक्षक<br>१) श्रीमती कादंबरी कदम<br>२) श्री. प्रियदर्शन जाधव<br>३) श्री. अनिकेत विश्वासराव<br>• प्रथम पारितोषिक - मढ निघालंय अनुदानाला (कलांश थिएटर)<br>• द्वितीय पारितोषिक -पाकिस्तानच यान (नाटयांकुर)<br>• उतेजनार्थ पारितोषिक - द गर्दभ गोंधळ (वझे महाविद्यालय)<br>उतेजनार्थ पारितोषिक- थिमक्का (ज्ञानसाधना महाविद्यालय) |
| ३ डिसेंबर २०२५ | जागतिक अपंग दिन | नाटक - ऊन पाऊस<br>सादरकर्ते - श्री. विजू माने<br>लेखिका: श्रीमती सारिका येवले ढेरंगे<br>दिग्दर्शक: डॉ. सुमित पाटील |
| २९ डिसेंबर २०२५ ते०२जानेवारी २०२६ | कै. उमेश शेणॉय यांच्या स्मरणार्थ क्रीडा महोत्सव राज्यस्तरीय कुमार गट कबड्डी स्पर्धा २०२६ | अंतिम विजयी संघ - गुड मोर्निंग स्पोर्ट्स क्लब, मुंबई शहर<br>अंतिम उपविजयी - ग्रिफिन जिमखाना, ठाणे |
| ०४जानेवारी २०२६ | आंतरशालेय व खुला गट एकपात्री अभिनय स्पर्धा | प्रमुख पाहुणे: - श्री. हेमंत भालेकर आणि श्री. संभाजी सावंत (खुल्या गटासाठी २५ आणि शालेय स्पर्धासाठी १५ जण सहभागी झाले.) |

| | | |
|---|---|---|
| ०६/जानेवारी २०२६ ते ०९जानेवारी २०२६ | आंतर शालेय क्रीडा स्पर्धा -२०२६ कबड्डी, लंगडी आणि खो-खो स्पर्धा | यंदा स्पर्धेचे १४ वे वर्ष होते. यात मुले व मुली मिळून लंगडी स्पर्धेत २१, खो-खो विभागात २५ व कबड्डी स्पर्धेत २८ जण सहभागी झाले. |
| १८जानेवारी २०२६ | सांस्कृतिक अमावास्या | मराठी नाटक एक रसास्वाद<br>सादरकर्ते- श्री. चंद्रशेखर ठाकूर आणि श्रीमती तृप्ती सरदेसाई |
| २६जानेवारी २०२६ | प्रजासत्ताक दिन आणि स्नेहमेळावा | प्रजासत्ताक दिन<br>प्रमुख पाहुणे- कार्योपाध्यक्ष श्री. राजेंद्र कर्णिक<br>स्नेहमेळावा:<br>तहहयात सभासद, खेळाडू आणि कलाकार यांचा स्नेहमेळावा व स्नेहभोजन<br>डॉ. मृदुला दाढे मिर्मित 'नौशाद ते अजय अतुल' संगीत रजनी |
| ११ फेब्रुवारी २०२६ | जपान कबड्डी असोसिएशन आंतरराष्ट्रीय मुलींचा संघ विरुद्ध अमर हिंद मंडळाचा मुलींचा संघ | मैत्रीपूर्ण सामना |
| १३ फेब्रुवारी २०२६ ते १७फेब्रुवारी २०२६ | कै. उमेश शेणॉय यांच्या स्मरणार्थ क्रीडा महोत्सव अंतर्गत | डायनॅमिक प्रायोगिक व्यावसायिक पुरुष व महिला गट खो-खो स्पर्धा |
| २१फेब्रुवारी २०२६ | अमर हिंद मंडळ आयोजित<br>जागतिक मातृभाषा दिनानिमित | \|\| काव्यसंध्या \|\|<br>निवेदन - श्री. संजय गवांडे<br>सन्माननीय कवी-<br>श्री. रमेश तांबे, श्रीमती संयुक्ता राठोड, श्री. संजय गवांडे, श्री. राजेश साबळे, श्री. मकरंद वांगणेकर. |
| २७फेब्रुवारी २०२६ | मराठी भाषा गौरव दिनानिमित्त स्वरचित काव्य मैफिल | \|\| शब्दांचे देणे \|\|<br>सादरकर्त्या - श्रीमती मिताली वाईरकर आणि श्रीमती दिक्षा शिंदे |
| ११ मार्च २०२६ | जागतिक महिला दिन | अमर हिंद मंडळाच्या कलाकार आणि खेळाडू यांनी मनोरंजनाचे कार्यक्रम सादर केले. |
| १८मार्च २०२६ | सांस्कृतिक अमावास्या | अभिवाचन -<br>कविताला आठवताना<br>संकलन आणि लेखन - श्रीमती उज्वला मेहेंदळे<br>संयोजक - श्री. प्रशांत कोठडिया |

| | | |
|---|---|---|
| | | सादरकर्त्या- श्रीमती सुषमा देशपांडे आणि श्रीमती मृदुला भाटकर<br>“अंतराय”- अभिवाचन<br>लेखन, दिग्दर्शक- श्रीमती प्रतिमा कुलकर्णी<br>अंतरे संगीत- श्री. मिलिंद जोशी<br>सादरकर्ते- श्रीमती शर्वरी पाटणकर आणि श्री. अक्षय शिंपी |
| २९मार्च २०२६ | आरोग्य चाचणी शिबीर | एस एल रहेजा हॉस्पिटल, माहीम मुंबई |

## क्रीडा विभागाचा अहवाल २०२५-२६

### खो-खो

३९ वी राज्य अजिंक्यपद किशोर व किशोरी गट निवड चाचणी खोखो स्पर्धा दि. २५ डिसेंबर २०२५ ते दि. २८ डिसेंबर २०२५ या कालावधीत वडाळा, मुंबई येथे झाली. या स्पर्धेमध्ये मुंबई संघातून खेळताना कु. वेदांत हडशी याची निवड झाली होती. किशोरी गटाच्या व्यवस्थापक पदी कु. संजना कुडव हिची निवड झाली होती.

५१ वी राज्य अजिंक्यपद कुमार व मुली गट निवड चाचणी खोखो स्पर्धा दि. ०४ डिसेंबर २०२५ ते दि. ०७ डिसेंबर २०२५ या कालावधीत अहिल्यानगर येथे झाली. या स्पर्धेमध्ये **मुंबई संघातून खेळताना कु. सोहम मोजर याची निवड झाली होती. मुंबई जिल्हा निवड समितीमध्ये अमर हिंद मंडळाची कार्यकारिणी सदस्य कु. मधुरा पेडणेकर ही होती.**

६१ वी राज्य अजिंक्यपद पुरुष व महिला निवड चाचणी खोखो स्पर्धा दि. १८ डिसेंबर २०२५ ते दि.२१ डिसेंबर २०२५ या कालावधीत बीड येथे झाली. या स्पर्धेमध्ये **मुंबई संघातून खेळताना पुरुष गटात कु. गणेश साहू आणि महिला गटात कु. संजना कुडव व कु. रुद्रा नाटेकर तसेच अमर हिंद मंडळाचे कार्यकारिणी सदस्य श्री. निलेश सावंत यांची पुरुष गटाच्या व्यवस्थापक पदी निवड झाली होती.** तसेच निलेश सावंत यांनी मुंबई जिल्हा पुरुष व महिला निवड समितीमध्ये निवडकर्ते म्हणून काम पहिले होते.

अखिल भारतीय नागरी सेवा यांच्या बालेवाडी, पुणे येथे दि. १९ मार्च २०२६ ते दि. २२मार्च २०२६ या कालावधीत पार पडलेल्या खो-खो स्पर्धेमध्ये अमर हिंद मंडळाचे कार्यकारिणी सदस्य श्री. रोहन चव्हाण यांनी पुरुष संघाचे प्रशिक्षक म्हणून कार्य पार पाडले.

अमर हिंद मंडळाचे **कार्यकारिणी सदस्य श्री. निलेश सावंत यांची दि. ११ जून २०२५ ते दि. १५ जून २०२५ या कालावधीत एस. जी. टी. विद्यापीठ, गुरूग्राम, हरियाणा येथे झालेल्या 'आंतरराष्ट्रीय खो-खो तांत्रिक अधिकारी कोर्स level III - २०२५' या परीक्षेसाठी महाराष्ट्र खोखो असोसिएशन कडून निवड झाली.** सदर आंतरराष्ट्रीय खो-खो तांत्रिक अधिकारी कोर्स level III - २०२५ या परीक्षेत ते पास होऊन ते आंतरराष्ट्रीय खोखो पंच झाले.

दैनंदिन खो खो चा सराव मंडळाच्या राष्ट्रीय खेळाडू व क्रीडा प्रतिनिधी सौ. उत्कर्षा शेणॉय तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. निलेश सावंत, श्री. रोहन चव्हाण, श्रीमती मधुरा पेडणेकर, श्रीमती संजना कुडव, श्री. आदेश कागडा हे घेत असतात.

## • व्यावसायिक पुरुष व महिला खोखो स्पर्धा २०२५-२६

अमर हिंद मंडळ, दादर आयोजित कै. उमेश शेणॉय यांच्या स्मरणार्थ क्रीडा महोत्सव अंतर्गत डायनॅमिक प्रायोगिक व्यावसायिक पुरुष व महिला खोखो स्पर्धा २०२५-२६, दि. १३ फेब्रुवारी २०२६ ते दि. १७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत अमर हिंद मंडळाच्या पटांगणात सायंकाळच्या सत्रात पार पडली. सदर स्पर्धेचे उद्घाटन मा. नगरसेवक श्री. यशवंत किल्लेदार यांच्या हस्ते पार पडले. उद्घाटन प्रसंगी मुंबई खोखो संघटना आणि अमर हिंद मंडळाचे पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते.

पारितोषिक वितरण समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनचे उपाध्यक्ष व महाराष्ट्र खोखो असोसिएशनचे सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव उपस्थित होते. त्यांच्या हस्ते पारितोषिक समारंभ पार पडला. पारितोषिक वितरण प्रसंगी अमर हिंद मंडळाचे पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते.

**व्यावसायिक पुरुष व महिला खोखो स्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे आहे.**

**व्यावसायिक पुरुष**

| अ.क्र. | प्राविण्य | व्यावसायिक संघाचे नाव | पारितोषिक बक्षीस |
|---|---|---|---|
| १ | अंतिम विजयी | पश्चिम रेल्वे | रु. ११,०००/- व चषक |
| २ | अंतिम उपविजयी | महाराष्ट्र पोस्ट | रु. ७,०००/- व चषक |
| ३ | तृतीय क्रमांक | बँक ऑफ इंडिया | रु. ५,०००/- व चषक |
| ४ | चतुर्थ क्रमांक | मुंबई महानगरपालिका | रु. ४,०००/- व चषक |
| ५ | सर्वोकृष्ट खेळाडू | श्री. वृषभ वाघ (पश्चिम रेल्वे) | रु. ५,०००/- |
| ६ | सर्वोकृष्ट संरक्षक | श्री. राहुल मंडल (पश्चिम रेल्वे) | रु. ३,०००/- |
| ७ | सर्वोकृष्ट आक्रमक | श्री. लक्ष्मण गवस (महाराष्ट्र पोस्ट) | रु. ३,०००/- |

**व्यावसायिक महिला**

| अ.क्र. | प्राविण्य | व्यावसायिक संघाचे नाव | पारितोषिक बक्षीस |
|---|---|---|---|
| १ | अंतिम विजयी | पश्चिम रेल्वे | रु. ५,०००/- व चषक |
| २ | अंतिम उपविजयी | मुंबई पोलीस | रु. ३,०००/- व चषक |
| ३ | तृतीय क्रमांक | महावितरण कंपनी | रु. ३,०००/- व चषक |
| ४ | सर्वोकृष्ट खेळाडू | श्रीमती अर्चना मांझी (पश्चिम रेल्वे) | रु. ३,०००/- |
| ५ | सर्वोकृष्ट संरक्षक | श्रीमती पायल पवार (मुंबई पोलीस) | रु. २,०००/- |
| ६ | सर्वोकृष्ट आक्रमक | श्रीमती कल्याणी कंक (पश्चिम रेल्वे) | रु. २,०००/- |

- **आंतरशालेय कबड्डी, खो-खो लंगडी स्पर्धा**

दरवर्षीप्रमाणे आंतरशालेय कबड्डी, खो-खो, लंगडी स्पर्धा दि. ०७ ते ०९ जानेवारी २०२६ दरम्यान यशस्वीरित्या आयोजित करण्यात आली. यंदा स्पर्धेचे १४ वे वर्ष होते. या स्पर्धेत लंगडी विभागात मुले व मुली गट १०+११ = २१ संघ तसेच खो-खो विभागात मुले व मुली गट १३+१२ =२५ संघ त्यानंतर कबड्डी मुले व मुली गट विभागात १५+१३= २८ संघ अशाप्रकारे शालेय संघांनी सहभाग घेतला होता. तसेच संपूर्ण स्पर्धेचा अंतिम निकाल सोबत जोडत आहे.

अंतिम विजयी व उपविजयी संघांना सर्टिफिकेट्स, शालेय बॅगा व ट्रॉफी वैयक्तिक अष्टपैलू खेळांडूना रु.३००/- + ३००/- + ५००/- अशाप्रकारे रक्कम देण्यात आली. या स्पर्धेसाठी उद्घाटक तसेच समारोपाचे प्रमुख पाहुणे यांचे उत्तम योगदान मिळाले व ही स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यात आली. तसेच मंडळाची स्पर्धा समितीमध्ये श्री. निलेश सावंत, श्री. साईनाथ काळसेकर, श्री. रोहन चव्हाण, कुमारी मधुरा पेडणेकर यांच्याबरोबर मंडळातील कार्यकर्ते, खेळाडू यांनी उत्तमरित्या काम केले.

**दि. ०६ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या कबड्डी स्पर्धेचा निकाल**

**मुली गट**

| 1. क्र. | प्राविण्य | संघाचे नाव |
|---|---|---|
| १ | प्रथम क्रमांक | डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालय |
| २ | द्वितीय क्रमांक | एस.आय.ई.एस हायस्कूल |
| ३ | तृतीय क्रमांक | आंध्रा एज्युकेशन सोसायटी |
| ४ | चतुर्थ क्रमांक | गौरीदत्त मित्तल विद्यालय |
| ५ | सर्वोत्कृष्ट खेळाडू | कु. स्वरा मोरे (एस.आय.ई.एस हायस्कूल) |
| ६ | सर्वोत्कृष्ट संरक्षक | कु. ईशा डिगे (डॉ. बाबासाहेब आंबेडकर) |
| ७ | सर्वोत्कृष्ट पकड | कु. वेदिका गवळी (एस.आय.ई.एस हायस्कूल) |

## मुले गट

| अ.क्र. | प्राविण्य | संघाचे नाव |
|---|---|---|
| १ | प्रथम क्रमांक | आंध्रा एज्युकेशन सोसायटी. |
| २ | द्वितीय क्रमांक | गौरीदत्त मित्तल विद्यालय. |
| ३ | तृतीय क्रमांक | श्री गणेश विद्यालय, मराठी माध्यम. |

| | | |
|---|---|---|
| ४ | चतुर्थ क्रमांक | चिकित्सक समूह विद्यालय. |
| ५ | सर्वोत्कृष्ट चढाई | कु. सुमित विश्वकर्मा - गौरीदत्त मित्तल. |
| ६ | सर्वोत्कृष्ट खेळाडू | कु. राज गुप्ता - आंध्रा हायस्कूल. |
| ७ | सर्वोत्कृष्ट पकड | कु. शुभम विश्वकर्मा - गौरीदत्त मित्तल विद्यालय. |

**दि. ०७ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या लंगडी स्पर्धेचा निकाल**

**मुली गट**

| अ.क्र. | प्राविण्य | संघाचे नाव |
|---|---|---|
| १ | अंतिम विजयी | ज्ञानविकास विद्यालय, ठाणे. |
| २ | अंतिम उपविजयी | श्री गणेश विद्यालय, मराठी माध्यम. |
| ३ | तृतीय क्रमांक | श्री गणेश विद्यालय, इग्रंजी माध्यम. |
| ४ | चतुर्थ क्रमांक | सोशल सर्व्हिस लीग, परेल. |
| ५ | सर्वोत्कृष्ट खेळाडू | कु. समृद्धी कदम - ज्ञानविकास विद्यालय. |
| ६ | सर्वोत्कृष्ट संरक्षक | कु. रेहा पोस्टूरे- श्री गणेश विद्यालय, मराठी माध्यम. |
| ७ | सर्वोत्कृष्ट आक्रमक | कु. श्रावणी मोरे - ज्ञानविकास विद्यालय. |

**मुले गट**

| 1. क्र. | प्राविण्य | संघाचे नाव |
|---|---|---|
| १ | अंतिम विजयी | ज्ञानविकास विद्यालय, ठाणे. |
| २ | अंतिम उपविजयी | सहयाद्री विद्यामंदिर, भांडूप. |
| ३ | तृतीय क्रमांक | श्री गणेश विद्यालय, वडाळा, मराठी. माध्यम. |
| ४ | चतुर्थ क्रमांक | चिकित्सक समूह शिरोळकर हायस्कूल, गिरगाव. |
| ५ | सर्वोत्कृष्ट खेळाडू | कु. मयुरेश घागरुम - सहयाद्री विद्यामंदिर, भांडूप. |

| | | |
|---|---|---|
| ६ | सर्वोत्कृष्ट संरक्षक | कु. साईराज बैलकर - ज्ञानविकास विद्यालय, ठाणे. |
| ७ | सर्वोत्कृष्ट आक्रमक | कु. साहिल शिंदे - ज्ञानविकास विद्यालय, ठाणे. |

**दि. ०८ ते ०९ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या खो-खो स्पर्धेचा निकाल**

**मुली गट**

| **अ.क्र.** | **प्राविण्य** | **संघाचे नाव** |
|---|---|---|
| १ | अंतिम विजयी | रा. फ नाईक विद्यालय कोपर खैराणे. |
| २ | अंतिम उपविजयी | ज्ञानविकास विद्यालय, ठाणे. |
| ३ | तृतीय क्रमांक | बंगाली एज्युकेशन सोसायटी, दादर. |
| ४ | चतुर्थ क्रमांक | महात्मा गांधी विद्यामंदिर, वांद्रे. |
| ५ | सर्वोत्कृष्ट खेळाडू | कु. श्रुती चोरमारे - रा. फ नाईक विद्यालय. |
| ६ | सर्वोत्कृष्ट संरक्षक | कु. वैष्णवी जाधव - रा. फ नाईक विद्यालय. |
| ७ | सर्वोत्कृष्ट आक्रमक | कु. श्रावणी मोरे - ज्ञानविकास विद्यालय. |

**मुले गट**

| अ. क्र . | प्राविण्य | संघाचे नाव |
|---|---|---|
| १ | अंतिम विजयी | ज्ञानविकास विद्यालय, ठाणे. |
| २ | अंतिम उपविजयी | महात्मा गांधी विद्यामंदिर, वांद्रे. |
| ३ | तृतीय क्रमांक | रा. फ नाईक विद्यालय कोपर खैराणे. |
| ४ | चतुर्थ क्रमांक | सरस्वती विद्यामंदिर, माहीम. |
| ५ | सर्वोत्कृष्ट खेळाडू | कु. साहिल शिंदे - ज्ञानविकास विद्यालय |
| ६ | सर्वोत्कृष्ट संरक्षक | कु. विनायक भणगे - ज्ञानविकास विद्यालय |
| ७ | सर्वोत्कृष्ट आक्रमक | कु. तन्मय पुजारी- महात्मा गांधी विद्यामंदिर |

## ▪ कबड्डी

**अमर हिंद मंडळ पुरुष व महिला कबड्डी संघाचा २०२५-२०२६ दरम्यानचा अहवाल.**

अमर हिंद मंडळ आयोजित कै. श्री उमेश शेणॉय क्रीडा महोत्सव राजस्तरीय कुमार गट कबड्डी स्पर्धा घेण्यात आली. दि. २९ डिसेंबर २०२५ ते दि. ०२ जानेवारी २०२६ या कालावधीत घेण्यात आली. या स्पर्धेत अंतिम विजय संघ गुड मोर्निंग स्पोर्ट्स क्लब मुंबई शहर ठरला. तर अंतिम उपविजेता संघ ग्रिफीन जिमखाना ठाणे हा संघ ठरला.

### पुरुष गट

- एच.जी.एस. क्रिडा मंडळ आयोजित १४ वर्षाखालील मुलांच्या कबड्डी स्पर्धेत आपल्या मंडळाचा कु. फरान खान याला वैयक्तिक पारितोषिक मिळाले. ही स्पर्धा दि. १२ एप्रिल ते १६ एप्रिल या कालावधीत घेण्यात आली.
- श्री. साईनाथ सेवा ट्रस्ट आयोजित १४ वर्षाखालील मुलांच्या कबड्डी स्पर्धेत आपल्या मंडळाचा कु. वेदांशू कदम याला वैयक्तिक पारितोषिक मिळाले. ही स्पर्धा दि. ४ मे ते ८ मे या कालावधीत घेण्यात आली.
- विविध राजस्तरीय व स्थानिक संघातून खेळताना खालील खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली. कु. फरान खान, कु. जय शिर्के, कु. जयेश यादव, कु. निखिल कदम, कु. संयोग रेवळे.

दैनंदिन सराव श्री. साईनाथ काळसेकर, कु.जयेश यादव, कु. रोहन घानगुटकर घेत असतात.

### महिला गट

- महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन आयोजित राज्य निवड चाचणी स्पर्धेत आपल्या मंडळाची कु. साईक्षा पेडणेकर, कु. वेदिका तिर्लोटकर, कु. आज्ञा तोडणकर (किशोरी गट) मुंबई शहर कबड्डी संघात निवड. दि. ५ नोव्हेंबर २०२५ ते ९ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत पुणे येथे स्पर्धा घेण्यात आली. कु. साईक्षा पेडणेकर हिची कर्णधार पदी निवड झाली.
- महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन आयोजित राज्य निवड चाचणी स्पर्धेत आपल्या मंडळाची कु. सलोनी नक्ती, कु. साईक्षा पेडणेकर (कुमारी गट) मुंबई शहर कबड्डी संघात निवड. दि. २५ नोव्हेंबर २०२५ ते २९ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत पुणे येथे स्पर्धा घेण्यात आली. कु. सलोनी नाक्ती हिची कर्णधार पदी निवड झाली.
- राष्ट्रीय मिल कामगार आयोजित महिला गट कबड्डी स्पर्धेत चतुर्थ क्रमांक पारितोषिक मिळाले.
- मुंबई शहर कबड्डी असोसिएशन (किशोरी गट) अंतिम विजयी पारितोषिक मिळाले.
- मुंबई शहर कबड्डी असोसिएशन (कुमारी गट) अंतिम उपविजेता पारितोषिक मिळाले.

- विविध राज्यस्तरीय व स्थानिक संघातून खेळताना खालील खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली. कु. साईक्षा पेडणेकर, कु. सलोनी नाक्ती, कु. भूमी मर्चंडे.

दैनंदिन सराव श्री. साईनाथ काळसेकर, कु. सलोनी नाक्ती, श्री. विजय राणे आणि कु. उत्कर्षा चोणकर घेत असतात.

**जपान कबड्डी असोसिएशन, महिला व अमर हिंद मंडळ, महिला यांचा मैत्रीपूर्ण सामना** -:

जपान कबड्डी असोसिएशन चा संघ कबड्डी हा खेळ समृद्ध करणे आणि भारत जपान संबंध खेळाद्वारे दृढ करणे यासाठी ९ फेब्रुवारी ते १४ फेब्रुवारी या कालावधीत मुंबई दौऱ्यावर आला होता. कबड्डी या खेळाला आंतरराष्ट्रीय महत्त्व निर्माण करून हा खेळ जागतिक पातळीवर समृद्ध करणे हा या भेटीमागील उद्देश होता.

मुंबई कबड्डी असोसिएशन चे सचिव श्री. विश्वास मोरे यांनी अमर हिंद मंडळाला त्यांच्याबरोबर मैत्रीपूर्ण सामना खेळण्याची अमूल्य संधी दिली, हे मंडळासाठी भूषणावह होते.

बुधवार दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी अमर हिंद मंडळाच्या प्रांगणात हा सामना संपन्न झाला. त्याचे प्रक्षेपण मंडळाच्या यू ट्यूब वरुन प्रसारित करण्यात आले. ही स्पर्धा पाहण्यासाठी छत्रपती व अर्जुन पुरस्कार विजेत्या श्रीमती माया आक्रे, छत्रपती पुरस्कार विजेत्या श्रीमती आशा गायकवाड, श्रीमती चित्रा नाबर तर राष्ट्रीय खेळाडू श्रीमती अलका कारखानीस फडणीस यांनी उपस्थिती दर्शवली. तसेच महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसीएशन च्या सदस्य व वसुंधरा फाऊंडेशन च्या अध्यक्ष श्रीमती मनीषा काटकर यांनी देखील हजेरी लावली.

तसेच कबड्डी असोसिएशनचे श्री. विश्वास मोरे आणि त्यांचे पदाधिकारी उपस्थित होते. पद्मश्री उदय देशपांडे यांनी नाणेफेक करून स्पर्धेला सुरवात केली. जपान कबड्डी असोसिएशन चे सेक्रेटरी जनरल मा. कवाई तसेच त्यांच्या संघातील १६ महिला व महिला प्रशिक्षक मा. अओकी या सामन्यास उपस्थित होते. मंडळाच्या संपूर्ण कार्यकारिणी च्या सहकार्य असल्यामुळे आणि मार्गदर्शनामुळे हा मैत्रीपूर्ण सामना यशस्वी झाला.

सगळ्यात शेवटी, मंडळाने त्यांना दिलेल्या स्मृतिचिन्हामुळे त्यांना झालेला आनंद त्यांच्या चेहऱ्यावरून ओसंडून वाहत होता.

## कला विभाग

अहवाल काळात मंडळाच्या 'रेशनकार्ड' या एकांकिकेने अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषद तसेच महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले.

तसेच मंडळाने बालनाट्य प्रशिक्षण शिबिर, राज्यस्तरीय एकांकिका लेखन स्पर्धा, कै. आंबा पडते राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा आणि नाट्यसंहिता वाचन हे उपक्रम संपन्न केले. महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धा, महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धा तसेच अनेक एकांकिका स्पर्धामध्ये भाग घेतला आणि पारितोषिके संपादन केली.

**नाट्यसंहिता वाचन** -

दि. २ ऑगस्ट २०२५ ते दि. ७ ऑगस्ट २०२५ या कालावधीत मंडळाने नाट्यसंहिता वाचन उपक्रम तत्कालीन मंडळाने कला विभाग प्रतिनिधी दत्ता सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न केला. या उपक्रमास रसिक प्रेक्षकांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. प्रत्येक दिवशी विविध लेखकांच्या संहितांचे वाचन झाले आणि श्रोत्यांनी त्याचा मन: पूर्वक आस्वाद घेतला. संहिता वाचन झाल्यावर प्रेक्षक, लेखक यांच्या मध्ये साधक बाधक चर्चा झाली. सदर उपक्रमाची जबाबदारी समीर दळवी, विनीत मराठे, सुभाष तोडणकर आणि दत्ता सावंत यांनी यशस्वीपणे सांभाळली. यात पक्ष्याच्या शोधात पिंजरा-रवींद्र लाखे, ऑन हायर- मंदार श्रोत्री, अर्धरात्र कलली - रवींद्र वाडकर, झुळूक - मेधा देशमुख आणि पासवाला - महेश केसरकर या एकांकीकांचे वाचन करण्यात आले.

**सांस्कृतिक अमावस्या**: - सांस्कृतिक अमावास्या अंतर्गत विविध कार्यक्रमांचे सादरीकरण झाले ते पुढीलप्रमाणे: ALEXA! Play Deshpande's will (दीर्घांक), शनैश्वरम (दशावतार), काठ (दीर्घांक), स्वर प्रसन्न (संहिता), काव्य नव्हे हा अमृत संचय (व्याख्यान), मराठी एक रसास्वाद (नाटक), कविताला आठवताना (अभिवाचन), अंतराय (अभिवाचन). या कार्यक्रमासाठी श्रीमती सीमा कोल्हटकर, श्री. सुरेश शिंदे, सुरेश बेडेकर आणि कु. मधुरा पेडणेकर यांनी अमूल्य योगदान दिले.

- **बालनाट्य प्रशिक्षण शिबिर** - बाल रंगभूमीच्या अर्ध्वयू लीला हडप यांच्या नेतृत्वाखाली १५ एप्रिल २०२५ ते २९ एप्रिल २०२५ या कालावधीत बालनाट्य शिबिर संपन्न झाले. या शिबिरात बालनाट्याची सर्वांगीण प्राथमिक ओळख, लेखन, दिग्दर्शन, अभिनय, नृत्य, संगीत, नेपथ्य, प्रकाशयोजना, रंगभूमी याची ओळख करून दिली. तसेच शिबिरात प्रामुख्याने रंगमंचावरील वावर, सभाधीटपणा, संभाषण, उच्चार व रंगभूमीशी संबंधित गोष्टी शिकवण्यावर भर दिला गेला. शिबिराचा लाभ ८ ते १६ वयोगटातील १८ जणांनी घेतला. तसेच शिबिराला मार्गदर्शक म्हणून रंगभूमीशी निगडित मान्यवर आणि नामवंत ज्या मध्ये सर्वश्री राजीव जोशी, दत्तात्रय सावंत, लीला हडप, संजय क्षेमकल्याणी, ओंकार जाधव, सुमित पाटील, मुक्ता बाम, रविंद्र ढवळे, रमेश तांबे, सम्राट साळवी यांनी केले. तर शिबिराचा समारोप २९ एप्रिल रोजी शिबिरार्थींच्या विविध कार्यक्रमांच्या सादरीकरणाने झाला. शिबिराला डॉ. मेघा गावडे, सुभाष तोडणकर, समीर चव्हाण, तेजल देशपांडे यांचे सहकार्य लाभले.

- **एकांकिका लेखन स्पर्धा**: - या स्पर्धेत एकूण २८ एकांकिका आल्या होत्या. त्याचे परीक्षण डॉ. समीर मोने आणि राजीव जोशी यांनी केले आणि त्यातून ५ एकांकिकेची निवड करण्यात आली. अहवाल काळातील या स्पर्धेचा बक्षीस समारंभ २८ ऑक्टोबर २०२५ रोजी कै. आबा पडते राज्यस्तरीय मराठी एकांकिका स्पर्धा (अंतिम फेरी) या कार्यक्रमामध्ये झाला. पहिल्या ३ क्रमांकाना रोख पारितोषिक व प्रमाणपत्र देण्यात आले तर ३ एकांकिकांना उत्तेजनार्थ प्रमाणपत्र देण्यात आले. त्याचा निकाल पुढीलप्रमाणे आहे.

  प्रथम पारितोषिक - “मुक्ती" - लेखक - योगेश वाटवे

  द्वितीय पारितोषिक - "लूप" - लेखक - जयेश मेस्त्री

  तृतीय पारितोषिक - "द पपेटियर" - लेखक - मनिष कोलगे

  उत्तेजनार्थ पारितोषिक - १) "लेखकायन”- लेखक - डॉ. प्रशांत पुंडे

  २) "वृंदावन" - लेखक - दत्तात्रय सावंत

  ३) “तू करेक्ट आहेस” - विद्या थोरात काळे "विजू"

- **आंतरशालेय व खुला गट एकपात्री अभिनय स्पर्धा: -** सलग तिसऱ्या वर्षी आयोजित केलेली ही स्पर्धा रविवार दि.४ जानेवारी २०२६ रोजी मंडळाच्या सभागृहात उत्साहाच्या वातावरणात पार पडली. स्पर्धेमध्ये खुल्या गटासाठी २५ आणि शालेय गटासाठी १५ स्पर्धकांनी सहभाग घेतला. श्री हेमंत भालेकर आणि श्री संभाजी सावंत यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. स्पर्धेची जबादारी समीर चव्हाण, सुभाष तोडणकर, तेजल देशपांडे, यांनी पार पाडली. स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे -

  खुला गट -: प्रथम - विजया गुंडप (३०००+ सन्मानचिन्ह+ प्रमाणपत्र)

  द्वितीय - अक्षता साळवी (२०००+ सन्मानचिन्ह + प्रमाण

  उत्तेजनार्थ - प्रथमेश सावंत, ओम जाधव, सोहम घरत (प्रत्येकी १०००+ प्रमाणपत्र)

  शालेय गट -: प्रथम- कृपा गायकवाड (१५००+ सन्मानचिन्ह+ प्रमाणपत्र)

  द्वितीय - आरोही पाटील (१०००+ सन्मानचिन्ह + प्रमाणपत्र)

  उत्तेजनार्थ - भार्गव चव्हाण, आयुषी वाळवे, तपस्या पाटील

  (प्रत्येकी ५००+ प्रमाणपत्र)

- **कै. आबा पडते राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा: -** या स्पर्धेचे हे २६ वे वर्ष होते. स्पर्धेची प्राथमिक फेरी १८ ,१९ नोव्हेंबर २०२५ रोजी अमर हिंद मंडळाच्या सभागृहामध्ये संपन्न झाली. स्पर्धेत २१ संस्थांनी आपल्या एकांकिकांचे सादरीकरण केले. श्री. मिहीर राजदा आणि श्री. महेंद्र कदम यांनी परीक्षण करून पाच एकांकिकांची अंतिम फेरीसाठी निवड केली. स्पर्धेची अंतिम फेरी २८ नोव्हेंबर २०२६ रोजी स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक येथे झाली. कादंबरी कदम, प्रियदर्शन जाधव, अनिकेत विश्वासराव यांनी परीक्षक म्हणून काम पहिले. तर यांच्या हस्ते पारितोषिक वितरीत करण्यात आला. स्पर्धा आयोजनांची जबाबदारी प्रमुख कार्यवाह सीमा कोल्हटकर यांच्याबरोबर कार्योपाध्यक्ष विजय राणे, समीर चव्हाण, सुरेश बेडेकर, योगिता बेडेकर, संज्योत मयेकर, सम्राट साळवी, दीपक गिरकर, सुभाष तोडणकर, साक्षी साळवी, अपेक्षा रानडे, प्रियांका जाधव, तेजल देशपांडे, सायली साळवी यांनी पार पाडली. स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे -

सर्वोत्कृष्ट एकांकिका: प्रथम क्रमांक: मढं निघाल अनुदानाला - कलांश थिएटर

द्वितीय क्रमांक: पाकिस्तानचं यान - नाट्याकुर

तृतीय क्रमांक: यंदा तृतीय क्रमांक देण्यात आलेला नाही.

उत्तेजनार्थ पारितोषिके: थिम्मका - ज्ञानसाधना महाविद्यालय

द गर्दभ गोंधळ - वझे महाविद्यालय

वैयक्तिक पारितोषिके: सर्वोत्कृष्ट लेखक: प्रतिक चौधरी - मढं निघालं अनुदानाला

सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक: महेश कापरे व सागर चव्हाण - मढं निघालं अनुदानाला

सर्वोत्कृष्ट नेपथ्य: सिद्धेश नांदलस्कर - थिम्मका

सर्वोत्कृष्ट प्रकाशयोजना: सिद्धेश नांदलस्कर - थिम्मका

सर्वोत्कृष्ट संगीत: सुबोध मालंडकर व चिन्मय सावंत - मढं निघालं अनुदानाला

सर्वोत्कृष्ट रंगभूषा: तेजश्री पिलनकर - मढं निघालं अनुदानाला

सर्वोत्कृष्ट वेशभूषा: मैथिली मोंडे व प्रिया ढगे - पाकिस्तानचं यान

सर्वोत्कृष्ट कलाकार: - ओमकार काकडे - मढं निघालं अनुदानाला

प्रसंजीत गायकवाड - मढं निघालं अनुदानाला

राहुल पेडणेकर - द गर्दभ गोंधळ

अपर्णा घोगरे - थि- म्मका

मनस्वी लगाडे द गर्दभ गोंधळ

सहाय्यक कलाकार: -

सहाय्यक अभिनेत्री: प्रचिती जामनगावकर - मढं निघालं अनुदानाला

सहाय्यक अभिनेता: विनित थिसे - मढं निघालं अनुदानाला

विनोदी कलाकार: सेजल जाधव - मढं निघालं अनुदानाला

- **महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धा :-** २२ व्या बालनाट्य स्पर्धेत मंडळाने राजीव जोशी लिखित आणि कविता मुरकर दिग्दर्शित 'ही धरा त्यांची सुध्दा आहे' या बालनाट्याचा प्रयोग २० जानेवारी २०२६ रोजी साहित्य संघ नाट्यगृह गिरगाव येथे सादर केला. या बालनाटकासाठी तेजल देशपांडे, सीमा कोल्हटकर, राजीव जोशी, समीर चव्हाण, दीपक गिरकर, सम्राट साळवी यांनी मेहनत घेतली. बालकलकारांनी प्रयोग खूप छान केला. यांना नेपथ्याचे द्वितीय पारितोषिक समीर चव्हाण याला आणि रंगभूषेचे तृतीय पारितोषिक अनिल कासकर यांना मिळाले.
- **रेशनकार्ड चे यश**

  अहवाल काळात मंडळाच्या कला विभागाच्या 'रेशनकार्ड' या एकांकिकेने महाराष्ट्रातील खालील स्पर्धामध्ये भाग घेतला होता.

  १) अखिल भारतीय नाट्य परिषद, मुंबई
  २) अखिल भारतीय नाट्य परिषद, बोरिवली शाखा आयोजित सुवर्णकलश एकांकिका स्पर्धा
  ३) अटल करंडक एकांकिका स्पर्धा

४) उंबरठा एकांकिका स्पर्धा
५) सांस्कृतिक कलादर्पण
६) पाली एकांकिका स्पर्धा
७) अभिव्यक्ति एकांकिका स्पर्धा
८) सवाई एकांकिका स्पर्धा
९) पारंगत एकांकिका सन्मान

खरतरं मार्च २०२५ मध्ये रेशनकार्ड या एकांकिकेने मालवणी एकांकिका स्पर्धेत प्रथम पारितोषिक पटकावून यश संपादन करून सुरवात केली होती. उत्तरोतर या एकांकिकेने अहवाल काळात अनेक पारितोषिके मिळवली. त्यात प्रामुख्याने, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद मुंबई यांनी आयोजित केलेल्या एकांकिका स्पर्धेत महाराष्ट्रातून २०० पेक्षा अधिक संस्थांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेच्या अंतिम २५ संघात स्थान मिळवले आणि एकांकिकेला सर्वोत्कृष्ट निर्मितीचा तृतीय क्रमांक मिळाला आणि रु.५००००/- आणि करंडक संपादन केला.

अटल करंडक या एकांकिका स्पर्धेत १०० हून अधिक संस्थांनी सहभाग घेतला होता आणि या स्पर्धेत सुद्धा या एकांकिकेने रु.१००००/- चे उत्तेजनार्थ पारितोषिक मिळवले. अभिव्यक्ती एकांकिका स्पर्धेत मंडळाची रेशनकार्ड ह्या एकांकिकेला रु.१२०००/- चे रोख तृतीय पारितोषिक मिळाले.

**महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धा**

महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेत रेशनकार्ड याच एकांकिकेचे २ अंकी नाटकात रूपांतर करून ते सादर करण्यात आले. मुंबई केंद्रातून प्राथमिक फेरीत द्वितीय पारितोषिक या नाटकाने मिळवले. प्राथमिक फेरीत मंडळाच्या कलाकार यांनी सांघिक पारितोषिकाशिवाय वैयक्तिक पारितोषिके संपादन केली आणि मंडळाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आणि राज्यनाट्य स्पर्धेच्या अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले. अंतिम फेरी रत्नागिरी येथे २ फेब्रुवारी २०२६ रोजी संपन्न झाली. राज्य नाट्य स्पर्धेच्या सांघिक पारितोषिका शिवाय कलाकार यांनी जी वैयक्तिक पारितोषिके मिळवली ती पुढीलप्रमाणे:

दिग्दर्शक द्वितीय- प्रथमेश पवार
नेपथ्य द्वितीय - समीर चव्हाण
प्रकाश योजना प्रथम- संजय तोडणकर
संगीत प्रथम - सम्राट साळवी
आणि उत्तेजनार्थ अभिनेत्री - प्रियांका जाधव

'रेशनकार्ड' या एकांकिकेला अंतिम फेरीत यश मिळाले नसले तरी रत्नागिरी येथे झालेल्या राज्यनाट्य स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रियांका जाधव हिला रौप्य पदकाने सन्मानित करण्यात आले. याचा बक्षीस समारंभ मंगळवार ३० जून २०२६ रोजी रविंद्र नाट्य मंदिर येथे संपन्न झाला. मा. मंत्री आशीष शेलार यांच्या हस्ते मंडळाला गौरविण्यात आले. मंडळाने मानपत्र, स्मृतिचिन्ह आणि रु. ६००००/- चे पारितोषिक मिळवले. एकंदरीत या कालावधीत मंडळाच्या नाट्यविभागाने नेत्रदीपक यश मिळवले.

"रेशनकार्ड" या एकांकिकेने रोख रक्कम रु.१,३२,०००/- बक्षीस म्हणून अर्जित केले व रु. ५२,०००/- कलाकारांना विभागून देण्यात आले.

- <u>सम्राट साळवी</u>: - सर्वोत्कृष्ट संगीत प्रथम - महाराष्ट्र राज्यनाट्य
- <u>समीर चव्हाण</u>: - सर्वोत्कृष्ट नेपथ्य - राज्यनाट्य स्पर्धा (द्वितीय)
  सर्वोत्कृष्ट नेपथ्य तृतीय -अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषद

- <u>प्रथमेश पवार</u>: - सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक प्रथम - मालवणी एकांकिका स्पर्धा
  सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक द्वितीय अभिव्यक्ती एकांकिका स्पर्धा
  सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक द्वितीय अखिल भारतीय एकांकिका स्पर्धा
  सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक द्वितीय मराठी राज्य नाट्य स्पर्धा
- <u>संजय तोडणकर</u>: -सर्वोत्कृष्ट प्रकाशयोजना प्रथम - मालवणी एकांकिका स्पर्धा
  सर्वोत्कृष्ट प्रकाशयोजना द्वितीय -अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद
  सर्वोत्कृष्ट प्रकाशयोजना प्रथम - मराठी राज्यनाट्य स्पर्धा
- <u>साई शिसेंकर</u>: - सर्वोत्कृष्ट प्रकाशयोजना प्रथम - अभिव्यक्ती एकांकिका स्पर्धा
- <u>प्रियांका जाधव</u>: - डी.वाय. पाटील.
  सर्वोत्कृष्ट अभिनेत्री प्रथम - अभिव्यक्ती एकांकिका स्पर्धा
  सर्वोत्कृष्ट अभिनेत्री प्रथम - मालवणी एकांकिका स्पर्धा
  सर्वोत्कृष्ट अभिनेत्री - अखिल भारतीय नाट्यपरिषद नाट्य करंडक
  लक्षवेधी अभिनेत्री - सुवर्ण कलश एकांकिका स्पर्धा
  उत्तेजनार्थ अभिनेत्री - बोलीभाषा एकांकिका स्पर्धा
  गुणवत्ता प्रमाणपत्र- महाराष्ट्र राज्य मराठी राज्यनाट्य स्पर्धा

- <u>डॉ. मेघा गावडे</u>:- लक्षवेधी - सुवर्ण कलश एकांकिका स्पर्धा
  उत्तेजनार्थ - अखिल भारतीय नाट्यपरिषद नाट्य करंडक
  उत्तेजनार्थ - बोलीभाषा एकांकिका स्पर्धा

**रेशनकार्ड एकांकिका पारितोषिके**

- अभिव्यक्ती एकांकिका स्पर्धा - तृतीय
- मालवणी एकांकिका स्पर्धा - प्रथम
- अखिल भारतीय नाट्यपरिषद नाट्य करंडक - तृतीय
- सुवर्णकलश एकांकिका स्पर्धा - लक्षवेधी एकांकिका
- ६४ वी मराठी राज्यनाट्य स्पर्धा - द्वितीय (रत्नागिरी येथे अंतिम फेरीसाठी निंवड. ही स्पर्धा २ फेब्रुवारी २०२६ रोजी रत्नागिरी येथे संपन्न झाली.)

तसेच रेशनकार्ड नाटकातील सहभागी झालेल्या पात्र परिचय कलाकार

1) प्रियांका जंगम - आई
2) सुभाष तोडणकर - सुभाष
3) विजया गुंडप - दीदी
4) समीर चव्हाण - अभिषेक
5) राजवीर आवळे - छोटा अभिषेक
6) माऊली साळवी - छोटी दीदी
7) योगिता बेडेकर - आजी
8) सुरेश बेडेकर - बापट काका
9) संज्योत मयेकर - तात्या परब

10) अपेक्षा रानडे - पाटील काकू

11) निनाद शिंदे - भटजी आणि इतर गावकरी

तंत्रज्ञ

1) प्रथमेश पवार - दिग्दर्शक आणि लेखक
2) अनिल कासकर - रंगभूषा
3) संजय तोडणकर - प्रकाशयोजना
4) योगिता बेडेकर - वेशभूषा.
5) सम्राट साळवी - संगीत संयोजन

**अमर हिंद मंडळाचे समाजसेवी, शैक्षणिक, वैद्यकीय उपक्रम, कार्यक्रम, स्पर्धा**

**रांगोळी प्रशिक्षण शिबिर -** संस्कार भारती च्या सहकार्याने मंडळाने सोमवार दि. ७ एप्रिल २०२५ ते बुधवार दि.९ एप्रिल २०२५ या कालावधीत रांगोळी शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिराला प्रतिभा करंदीकर यांचे मार्गदर्शन लाभले. या शिबिराचा लाभ एकूण २२ जणींनी घेतला.

**<u>स्नेहमेळावा:</u>**

या कार्यक्रमा अंतर्गत या अहवाल काळात दि. १ मे २०२५ रोजी "ठरता ठरता ठरेना" या नाटकाचा प्रयोग रविंद्र नाट्यमंदिर येथे ठेवण्यात आला होता. मंडळाचे पदाधिकारी, तहहयात सभासद, हितचिंतक, कार्यकर्ते, खेळाडू, कलाकार यांनी आणि त्यांच्या कुटुंबियांनी या नाटकाच्या प्रयोगाला उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी केला. यात प्रमुख भूमिका सागर देशमुख आणि विनीता खरात यांची होती.

**एरोमॉडेलिंग शिबिर -**

या अंतर्गत शालेय विद्यार्थ्यांसाठी एक आगळा वेगळा उपक्रम मंडळाने १८ मे २०२५ रोजी आयोजित केला होता. शास्त्रवाहिनी, पुणे या संस्थेच्या सहकार्याने एरोमॉडेलिंग, म्हणजेच विमानांच्या प्रतिकृती बनवणे आणि उडवणे, याची कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेत एरोमॉडेलिंगमधून मुले विज्ञानातील संकल्पना कळत न कळत शिकली. ह्या कार्यशाळेत मुलांना या क्षेत्रातील तज्ञांकडून विमाने बनविणे, नियंत्रणाच्या पद्धती व त्यांचा वापर ह्याचे मार्गदर्शन मिळाले. या कार्यशाळेचा लाभ २४ विद्यार्थ्यांनी घेतला. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी २ लुप ग्लायडर, १ न मोडणारे प्लॅस्टिक चे विमान स्वतः बनविण्याचा आनंद घेतला. तर विद्यार्थ्यांना १ फोम पासून बनविलेले चातक विमान, १ तेजस विमान आणि १ स्टंट प्लेन अशी विमाने देण्यात आली. मुलांनी मंडळाच्या प्रांगणात विमाने उडवून आनंद घेतला. या कार्यशाळेसाठी सीमा कोल्हटकर, संपदा कोल्हटकर आणि शुभम काटकर, तेजश्री भोसले यांनी सहकार्य केले. हे शिबिर १८ मे २०२५ रोजी संपन्न झाले.

**<u>स्वातंत्र्यदिन आणि गुणगौरव:</u>**

शुक्रवार दि. १५ ऑगस्ट २०२५ रोजी भारताच्या स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने मंडळाचे तहहयात सभासद आणि माजी कार्यवाह श्री. रविंद्र ढवळे यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहणानंतर प्रमुख पाहुण्यांचे उपस्थितांना मार्गदर्शन करणारे भाषण झाले आणि त्यानंतर त्यांच्या हस्ते खेळाडू, कलाकार यांचा गुणगौरव करण्यात आला. कै. रमेश वरळीकर सरांच्या स्मरणार्थ त्यांचे बंधू श्री. विजयकुमार व श्री. नंदकूमार या त्यांच्या कुटुंबियांनी दिलेल्या रु.२०००००/- च्या देणगीमधून खो खो मधील विशेष उल्लेखनीय कामगिरी करणारे खेळाडू कु. आदेश कागडा आणि कु. देविशा म्हात्रे यांना प्रत्येकी रु. ५०००/- पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

**<u>कै. काशीनाथ घाणेकर</u>** १४ सप्टेंबर २०२५ या दिवशी कै. काशीनाथ घाणेकर यांच्या जयंतीनिमित्त 'मी आणि डॉ. काशिनाथ घाणेकर' हा रमेश भिडे लिखित सादरीकरणाचा उत्कृष्ट कार्यक्रम मंडळाच्या सभागृहात संपन्न झाला.

**<u>मटा नवरंग पाककला स्पर्धा: -</u>**

नवरात्रोत्सवानिमित्त महिलांच्या पाककौशल्याला व्यासपीठ मिळवून देणारी 'मटा नवरंग पाककला स्पर्धा' मंगळवार दिनांक २३ सप्टेंबर २०२५ रोजी पार पडली. ही स्पर्धा 'महाराष्ट्र टाईम्स' आणि अमर हिंद मंडळ यांच्या सहयोगाने दादर येथे आयोजित करण्यात आली होती. यावेळी स्पर्धक महिलांनी नियमांचे काटेकोर पालन करून चवदार पदार्थांची मेजवानी सादर केली. 'आम्ही सारे खवय्ये' फेम अभिनेता संकर्षण कऱ्हाडे आणि शेफ डॉ. अमोल राऊळ यांनी या स्पर्धेचे परीक्षण केले. या स्पर्धेत मोहिनी घरत यांनी प्रथम क्रमांक, गीता कोटेकर यांनी द्वितीय आणि मिता अय्यर यांनी तृतीय क्रमांक पटकावला. तसेच ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रमुख कार्यवाह सीमा कोल्हटकर यांनी महत्वाची भूमिका बजावली.

**<u>अमर ऊर्जा पुरस्कार : २०२५-२०२६</u>**

अहवाल काळात २०२५-२६ सालासाठी अमर ऊर्जा पुरस्कारासाठी एकूण ९२ संस्थांनी अर्ज केले होते. त्यांच्यातून ५ संस्थांची निवड केली गेली. परंतु हा पुरस्कार समारंभ शनिवार दिनांक १८ एप्रिल २०२६ रोजी सायकांळी ६.०० वाजता अमर हिंद मंडळाच्या प्रांगणात संपन्न झाला. रोख रु. १,००,०००/- सन्मानचिन्ह आणि मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप होते. त्या संस्था पुढीलप्रमाणे.

1) आस्था फाउंडेशन औरंगाबाद, छत्रपती संभाजीनगर
2) केशवस्मृती प्रतिष्ठा, जळगाव
3) सहारा ग्रामविकास बहुउद्देशीय संस्था, अमरावती
4) क्वॉलिटी एज्युकेशन स्पोर्ट ट्रस्ट (क्वेस्ट), पालघर
5) वात्सल्य सामाजिक संस्था, धाराशिव

हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष विजय जोशी, उपाध्यक्ष रमेश तांबे, विठ्ठल सोनटक्के तसेच विश्वस्त दीपक पडते व प्रमुख कार्यवाह सीमा कोल्हटकर यांनी महत्वाची भूमिका बजावली.

**महिला दिन:** ११ मार्च २०२६ रोजी महिला दिन मंडळाच्या सभागृहात संपन्न झाला. मंडळाचे कलाकार आणि खेळाडू महिला, मुली यांनी विविध कार्यक्रम सादर करून महिला दिन साजरा केला. यासाठी मधुरा पेडणेकर आणि नीलेश सावंत यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विशेष सहकार्य केले.

**देणग्या:-**

अहवाल काळात खालील देणग्या मिळाल्या. आमच्या कार्याला देणग्या देऊन आर्थिक मदत केल्याबद्दल देणगीदारांचे मनापासून आभार.

| अ.क्र | नाव | दिनांक | देणगी देण्याचा उद्देश | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | अनुराधा ठाकूर | ५ एप्रिल २०२५ | वसंत व्याख्यानमाला | रु.५०,०००/- |
| २ | अरुण देशमुख | २१ एप्रिल २०२५ | वसंत व्याख्यानमाला | रु. २,५००/- |
| ३ | रविंद्र ढवळे | ३० सप्टेंबर २०२५ | सर्वसाधारण | रु. ७,५००/- |
| ४ | विजय जोशी | ०८ सप्टेंबर २०२५, १० ऑक्टोबर २०२५, १३ नोंव्हेबर २०२५, ०४ डिसेंबर २०२५, ०६ जानेवारी २०२६, १३ फेब्रुवारी २०२६, १८ मार्च २०२६ | क्रीडा विभाग, कला विभाग, सर्वसाधारण | रु.२१,०००/- |
| ५ | अमीत किंबहुने | ५ सप्टेंबर२०२५ | सर्वसाधारण | रु. २,५००/- |
| ६ | जीवन पैलकर | २ जानेवारी २०२६ | सर्वसाधारण | रु. १,१००/- |

तसेच अहवाल काळात श्रीमती उत्कर्षा तळेकर आणि श्री. अमीत किंबहुने यांनी Overhead Projector मंडळाला भेट दिला. त्यांचेही आभार !

**सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय आणि सांस्कृतिक कार्य करणाऱ्या समाजसेवी संस्थांना विनामूल्य/सवलतीच्या दरात सभागृह** या काळात मंडळाने 'सखी साऱ्याजणी' या संस्थेला सवलतीच्या दरात सभागृह दिले.

## समाजकल्याण मदत निधी

मंडळाने अहवाल काळात जिल्हा सैनिक कल्याण निधी रु.१,००,०००/-, तर द ब्लाइंड असोसिएशन नॅशनल सोसायटी फॉर द ब्लाइंड रु.५०००/- यांना देणग्या दिल्या.

तसेच जिल्हा परिषदेच्या देवगड येथील जि.प.प्रा. शाळा नं.१ मणचे देवगड या शाळेला सुमारे रु.३९०००/- चा संगणक देण्यात आला.

## समारोप :-

मंडळाने अहवाल काळात अनेक नवनवीन गोष्टी करण्याचा प्रयत्न केला. त्यातील एक महत्वाची गोष्ट म्हणजे या वर्षी आयोजित केलेली व्यावसायिक खो-खो स्पर्धा तसेच राज्यस्तरीय कै. उमेश शेणॉय स्मरणार्थ कबड्डी स्पर्धा. या दोन्ही स्पर्धांना प्रचंड प्रतिसाद मिळाला. वर्षभरात झालेले कार्यक्रम, उपक्रम आणि स्पर्धा यांच्या आयोजनासाठी तसेच निधींचा योग्य विनियोग करण्यासाठी जास्तीत जास्त तहहयात सभासद, खेळाडू, कलाकार यांना मंडळाच्या कार्यात सामावून घेण्यात आले. मंडळाची कार्यकारी समिती एकत्र सहकार्याने काम करीत आहे. त्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त करीत आहोत.

अहवाल काळात मंडळाचे हिशेब तपासनीस मे.व्ही.डी.मुळ्ये व लेखापाल अजय पैठणकर यांनी मंडळाला केलेल्या वेळोवेळी सहकार्याबद्दल त्यांचे आभार मानते. संयुक्त कार्यवाह अमित किंबहुने हे आपल्या ज्ञानाचा उपयोग करून मंडळाचा आर्थिक ताळेबंद तयार करतात आणि सर्व आर्थिक व्यवहार सांभाळत आहेत त्याबद्दल त्यांचे आभार. तसेच मंडळाचे दैनंदिन कामकाज नेटाने व निगुतीने सांभाळणारी लिपिक कुमारी तेजश्री भोसले, कुमारी ऋतिका वग्रे आणि कर्मचारी श्री. विष्णू वग्रे ह्यांचेही आभार मानते.

मयूर कॅटरिंग सर्विसेच्या सौ. गौरी पाटील, श्री. मयूर पाटील तसेच त्यांचे कर्मचारी यांचे वेळोवेळी होणाऱ्या कार्यक्रमात आणि उपक्रमात मिळणाऱ्या सहकार्याबद्दल मंडळातर्फे आभार व्यक्त करीत आहोत. गेल्या वर्षभरात झालेल्या कार्यक्रमांना यशस्वी होण्यासाठी सहकार्य दिलेल्या मंडळाचे पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य, कला व क्रीडा विभागाचे वार्षिक सभासद या सर्वांचे तसेच देणगीदारांचे मन: पूर्वक आभार मानते.

विविध वृत्तपत्रे आणि वाहिन्यांचे प्रतिनिधी, विशेष म्हणजे एबीपी माझा चे मुख्य संपादक श्री. राजीव खांडेकर, सहसंपादक श्रीमती सरिता कौशिक, श्री. विजय साळवी आणि त्यांच्या सर्व टीमचे आभार मानते. तसेच महाराष्ट्र टाईम चे संपादक समीर कर्वे, अनुजा चवाथे आणि त्यांच्या सर्व टीमचे देखील आभार मानते. आपल्या कार्यक्रमांना वेळोवेळी विनामूल्य प्रसिद्धी देऊन मंडळाच्या कार्याला महाराष्ट्रभर पोहचवण्याचे काम त्यांनी केले, त्याबद्दल विशेष आभार मानते.

अहवाल कालावधीत आयोजित केलेल्या कार्यक्रमात प्रेक्षक म्हणून सहभागी होऊन सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यास सहकार्य करणाऱ्या सर्व संबधितांचे, कार्यकर्ते, हितचिंतक, कलाकार, खेळाडू, मंडळाचे कर्मचारी, हिमालयन सिक्युरिटीचे कर्मचारी तसेच ज्ञात, अज्ञात या सर्वांचे कृतज्ञतापुर्वक उल्लेख करून पुढील वाटचालीस या सर्वांचे सहकार्य मिळेल अशी सदिच्छा व्यक्त करून हा अहवाल समाप्त करीत आहे.

कळावे लोभ असावा आणि तो वृद्धींगत व्हावा ही विनंती.

कार्यकारी समितीच्या अनुमतीने

राजेंद्र कर्णिक
प्रमुख कार्यवाह.

## भावपूर्ण श्रद्धांजली

**कै. दिपक नाडकर्णी :-** दि. १५ मे २०२६ मंडळाचे माजी कार्यकारी सदस्य दीपक नाडकर्णी यांचे दि. १५ मे २०२६ रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांना संपूर्ण कार्यकारिणी तर्फे भावपूर्ण श्रद्धांजली

**कै.सतीश रेडीज: -** गेले पाच दशके मंडळाच्या विविध पदांवर काम करून शेवटी विश्वस्त म्हणून मंडळाचा कार्यभार सांभाळला. तसेच मुंबई खो खो संघटनेतर्फे त्यांना २०२२-२३ च्या कै. एकनाथ साटम ज्येष्ठ कार्यकर्ता पुरस्काराने गौरवण्यात आले. मंडळाच्या प्रत्येक कार्यात सिंहाचा वाटा असणारे अमर हिंद मंडळाचे माजी विश्वस्त सतीश रेडीज यांचे शुक्रवार दि ३ जुलै २०२६ रोजी हदय विकाराने निधन झाले.

अहवाल काळात निधन पावलेले मंडळाचे तहहयात सभासद, हितचिंतक, कार्यकर्ते तसेच ज्ञात अज्ञात सभासदांना अमर हिंद मंडळातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.

## (परिशिष्ट 'अ')

## १ एप्रिल २०२५ ते १० ऑगस्ट २०२५

## संयुक्त व कार्यकारी समिती सभा उपस्थितीची माहिती

| अ.क्र. | नाव | पद | संयुक्त सभा (३) | कार्यकारी सभा (४) |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. सुभाष सराफ | विश्वस्त | २ | * |
| २ | श्री. अरुण देशपांडे | विश्वस्त | ३ | * |
| ३ | श्री. दीपक पडते | विश्वस्त | ३ | * |
| ४ | श्री. भास्कर सावंत | अध्यक्ष | १ | * |
| ५ | श्री. राजीव जोशी | उपाध्यक्ष | १ | * |
| ६ | श्री. श्रीकृष्ण राणे | उपाध्यक्ष | निधन | * |
| ७ | श्री. दत्ता सावंत | कार्याध्यक्ष | २ | ४ |
| ८ | श्रीमती सीमा कोल्हटकर | प्रमुख कार्यवाह | ३ | ४ |
| ९ | श्री. प्रफुल्ल पाटील | कोषाध्यक्ष | ३ | ४ |
| १० | श्री. विजय राणे | कार्योपाध्यक्ष | ३ | ४ |
| ११ | श्री. रविंद्र ढवळे | संयुक्त कार्यवाह | २ | ३ |
| १२ | श्री. जतीन टाकळे | संयुक्त कार्यवाह | २ | ४ |
| १३ | श्री. दीपक साडविलकर | सदस्य | २ | ३ |
| १४ | श्री. रमेश नाटेकर | सदस्य | १ | ४ |
| १५ | श्री. राजेंद्र कर्णिक | सदस्य | १ | ३ |
| १६ | श्री. निलेश सावंत | सदस्य | ३ | ४ |
| १७ | श्रीमती नेहा खरे | सदस्य | १ | ३ |
| १८ | श्री. साईनाथ काळसेकर | स्वीकृत सदस्य | ३ | ४ |
| १९ | श्री. रोहन चव्हाण | स्वीकृत सदस्य | ३ | ४ |
| २० | श्री. अमित किंबहुने | स्वीकृत सदस्य | २ | ३ |
| २१ | श्रीमती उत्कर्षा तळेकर | स्वीकृत सदस्य | २ | ४ |

नवनिर्वाचित कार्यकारिणी - १२ ऑगस्ट २०२५ ते ३१ मार्च २०२६

| अ.क्र. | नाव | पद | संयुक्त सभा (३ ) | कार्यकारी सभा (१०) |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. सुभाष सराफ | विश्वस्त | ३ | * |
| २ | श्री. अरुण देशपांडे | विश्वस्त | ३ | * |
| ३ | श्री. दीपक पडते | विश्वस्त | ३ | * |
| ४ | श्री. विजय जोशी | अध्यक्ष | ३ | * |
| ५ | श्री. रमेश तांबे | उपाध्यक्ष | ३ | * |
| ६ | श्री. विठ्ठल सोनटक्के | उपाध्यक्ष | २ | * |
| ७ | श्री. विजय राणे | कार्याध्यक्ष | ३ | १० |
| ८ | श्रीमती सीमा कोल्हटकर | प्रमुख कार्यवाह | ३ | १० |
| ९ | श्री. प्रफुल्ल पाटील | कोषाध्यक्ष | ३ | ९ |
| १० | श्री. राजेंद्र कर्णिक | कार्योपाध्यक्ष | २ | ९ |
| ११ | श्री. अमित किंबहुने | सहकार्यवाह | ३ | ९ |
| १२ | श्रीमती उत्कर्षा तळेकर | सहकार्यवाह | ३ | ८ |
| १३ | श्री. निलेश सावंत | सदस्य | २ | ९ |
| १४ | श्रीमती नेहा खरे | सदस्य | २ | ७ |
| १५ | श्री. साईनाथ काळसेकर | सदस्य | ३ | ९ |
| १६ | श्री. रोहन चव्हाण | सदस्य | ३ | १० |
| १७ | कुमारी मधुरा पेडणेकर | सदस्य | ३ | १० |